## तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१ व सहायक सत्र न्यायाधीश यांचे न्यायालय,यवतमाळ

**सत्र खटला क्र. १५/२०१९**
**निशाणी क्र.३९**

**महाराष्ट्र शासन** तर्फे पो.स्टे. घाटंजी सरकारी अभियोक्ता
**..वि..**
**भारत माणिक दलाल** आरोपी.

| | |
|---|---|
| **शासन तर्फे साक्षीदार क्र. २** | |
| मी याद्वारे शपथपूर्वक सांगतो की - | |
| माझे संपूर्ण नाव | गोविंद राजाराम इंगोले |
| वय अंदाजे ५१ वर्षे | धंदा- नौकरी, विस्तार अधिकारी |
| राहणार | यवतमाळ ता. जि. यवतमाळ. |
| **सरतपासणी श्री. एन.एन.पांडे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचेमार्फत शपथेवर सुरुः-** | |

सन २०१६ मध्ये मी ग्रामसेवक म्हणून ग्राम पंचायत कुरली येथे कार्यरत होतो व त्याची पंचायत समीती घाटंजी होती. दिनांक १६/०७/२०१६ रोजी पंचायत समिती घाटंजी येथील सभागृहामध्ये ग्रामसेवकांची विकास कामासंदर्भातील आढावा सभा होती. त्या सभेमध्ये तालूक्यातील सर्व ग्रामसेवक, विस्तार अधिकारी व गट विकास अधिकारी हजर होते. तसेच त्या सभेमध्ये ग्रामसेवक अमोल भांडवलकर, बि. एन. ठाकरे, संतोष माहूरे, मंगेश गाउत्रे, योगेश माहूरे, अतुल हांडे, सत्यपाल घाटे आणि नंदा कांगणे तसेच विस्तार अधिकारी डी.बी. मस्के, गटविकास अधिकारी श्री मानकर हे व इतर कर्मचारी हजर होते. ती सभा सकाळी ११.०० वाजता सुरु झाली व संध्याकाळच्या ४.४५ वाजता संपली. त्या सभेनंतर आरोपी भारत दलाल सभागृहामध्ये आला. त्यावेळी आमची विस्तार अधिका-यासोबत चर्चा चालू होती. त्या दरम्यान आरोपी भारत दलाल व नंदा कांगणे यांच्यामध्ये बाचाबाची झाली व त्यांच्यामध्ये ती बाचाबाची मस्टरच्या कारणावरुन तसेच बिल काढण्याच्या कारणावरुन झाली. त्यामुळे तेथे उपस्थित असलेल्या लोकांनी त्यांना समजविले. आरोपीमध्ये व नंदा कांगणेमध्ये शाब्दीक बोलचाल झाली. त्यानंतर पोलीस स्टेशनमध्ये कैफियत देण्यात आली. मी आरोपीला ओळखतो व तो आज न्यायालयात हजर आहे. पोलीसांनी माझे बयान नोंदविले होते. असे घडले नव्हते की *''भारत दलाल त्या सभेमध्ये आल्यानंतर सौ नंदा*

*कांगणे हिस बघून विहिरीच्या मस्टरवर सहया का करीत नाही, तु जास्त शहाणी झाली का ? तु स्वतःला कोण समजते, तु साली जास्त माजली अशी अश्लील भाषेत शिवीगाळ केली, त्यानंतर तिची साडी ओढली व तिचा हात पकडला तिची बांगडी व केस ओढून तिचा सर्व लोकांसमोर विनयभंग केला व तिचे मंगळसुत्र ओढण्याचा प्रयत्न केला, तसेच तु उद्या गावात ये तुला जिवानिशी मारुन टाकतो अशी धमकी दिली. त्या वादामध्ये तिच्या हाताला सुध्दा जखमा झाल्या आहे.''*

२. पोलीसांनी मला पंचायत समीती सभागृहामध्ये पंच म्हणून बोलाविले होते. घटनास्थळ पोलीसांना सर्वांनी दाखविले. पोलीसांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला, त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकूर बरोबर आहे व **तो निशाणी क्रमांक ४० वर** आहे. त्यावेळी दुसरे पंच बि. एन. ठाकरे हे हजर होते.

**साक्षीदार त्यांच्या बयानाप्रमाणे पुरावा देत नसल्यामुळे त्याची उलटतपासणी घेण्याची परवानगी सरकारी वकिलांनी मागीतली. त्यानूसार परवानगी देण्यात आली.**

**उलटतपासणी सरकारतर्फे श्री एन.एन.पांडे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचेमार्फत सुरुः-**

३. माझे शिक्षण पदवीपर्यंत झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की आरोपी व नंदा कांगणे मध्ये मस्टरच्या कारणावरुन वादावादी झाली. हे म्हणणे खरे नाही की आरोपीने नंदाला म्हटले की तु जास्त माजली व शहाणी झाली, तु स्वतःला कोण समजते.

**प्रश्न-** आरोपीने नंदाला शिवीगाळ केली ?

**उत्तर-** आरोपी व नंदाने एकमेकांना शिवीगाळ केली.

४. हे म्हणणे खरे नाही की आरोपीने फिर्यादी नंदाचा हात धरला तसेच नंदाची साडी ओढली, तसेच नंदाची बांगडी, केस व मंगळसुत्र ओढून तिचा विनयभंग करण्याचा प्रयत्न केला व या वादामध्ये नंदाला जखम झाली. हे म्हणणे खरे नाही की आरोपीने नंदाला धमकी दिली की "तु उद्या गावात ये तुला मारुन टाकतो". पोलीसांनी माझे बयान माझ्या सांगण्याप्रमाणेच नोंदविले. माझ्या बयानातील अधोरेखांकित भाग 'अ' मला वाचून दाखविला, तो बरोबर नाही. तो पोलीसांनी का लिहिला याचे कारण मी सांगू शकत नाही.

५. मी विस्तार अधिकारी म्हणून आर्णी येथे कार्यरत आहे. माझी पोलीसांसोबत दुश्मणी नाही. पोलीसांनी माझ्यावर कोणताही दबाव टाकला नाही. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपीला वाचविण्याकरीता खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलट तपासणी आरोपींचे वकील श्री. ए. डी. वाघ यांचे मार्फत सुरु -</u>**

६. फिर्यादी नंदा ही माझी कार्यालयीन सहकारी होती व नंदा ही टिटवी ग्रामपंचायत येथे कार्यरत होती. मला माहित नाही की ग्रामपंचायतच्या पदाधिका-यांनी नंदाच्या विरोधात तक्रारी दिल्या होत्या. श्री डी.बी. मस्के हे माझे विस्तार अधिकारी त्यावेळी होते. हे म्हणणे खरे नाही की घटनेच्या दिवशी मी घटनास्थळावर हजर नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की माझ्यासमोर आरोपी व नंदामध्ये बाचाबाची झाली नाही तसेच भांडण झाले नाही. पंचनाम्यासाठी पंच म्हणून हजर राहाण्यासाठी पोलीसांनी मला समन्स दिला नव्हता. पंचनाम्यावर सही करण्यासाठी आम्हाला वरिष्ठांची परवानगी घ्यावी लागते. तशी परवानगी या प्रकरणामध्ये मी घेतलेली नाही. साक्षीदार स्वतः सांगतो की पंचनामा सभागृहातच वरिष्ठांच्या उपस्थितीत झाल्यामुळे तशा परवानगीची आवश्यकता नव्हती. हे म्हणणे खरे आहे की पोलीसांच्या सांगण्यावरुन मी पंचनाम्यावर सहया केल्या. हे म्हणणे खरे नाही की मी न वाचताच पंचनाम्यावर सहया केल्या. हे म्हणणे खरे नाही की नंदा कांगणे ह्या माझ्या सहकारी असल्यामुळे, त्यांच्या सांगण्यावरुन मी आज खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी घटनास्थळावर हजर नव्हतो.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास-काही नाही.** **श्रवणोत्तर स्वीकृत**

(पी.एस.इंगळे)
दिनांक - ०५/१२/२०२५ अतिरिक्त सत्र न्यायाधीश, यवतमाळ.